दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | शनिवार, 03 ऑक्टोबर 2026 | अंक क्र. 141 | वर्ष 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

आपल्याकडे काही न्युज सबंधित महत्वाचे व्हीडिओ असतील तर खालील नंबर पाठवा. मो. 8421577797 आपले नाव गुपीत ठेवण्यात येईल

# आष्टी बसस्थानकात दारुड्यांचा धिंगाणा; प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर!

## चालत्या बसवर दगडफेक; प्रवासी भयभीत : बसस्थानक परिसरात बेकायदा दारूविक्रीला अभय कोणाचे?

■ आष्टी (प्रतिनिधी) :

आष्टी बसस्थानकाच्या आवारात एका मद्यधुंद माथेफिरूने धिंगाणा घालत प्रवासी बसवर दगडफेक केल्याच्या प्रकारामुळे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. बसमध्ये प्रवासी असतानाच दगडफेक झाल्याने एखादी मोठी दुर्घटना घडली असती तर त्याला जबाबदार कोण, असा संतप्त सवाल प्रवाशांकडून उपस्थित केला जात आहे.

बसस्थानक की दारुड्यांचा अड्डा?

आष्टी बसस्थानक परिसरात मद्यपींचा वावर वाढल्याच्या तक्रारी प्रवाशांकडून होत आहेत. विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक आणि विद्यार्थिनींना या प्रकारामुळे मोठी कुचंबणा सहन करावी लागत असल्याचे सांगितले जात आहे. बसची प्रतीक्षा करणाऱ्या प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला असून, बसस्थानक परिसरात पोलिसांची नियमित गस्त वाढविण्याची मागणी होत आहे.

### महिला प्रवाशांची कुचंबणा; प्रशासनाचे लक्ष कधी जाणार?

■ बसस्थानक परिसर हा सर्वसामान्य नागरिकांसाठी सुरक्षित असणे अपेक्षित असताना, मद्यपींचा वाढता वावर आणि त्यातून निर्माण होणारे प्रकार चिंताजनक असल्याचे प्रवाशांचे म्हणणे आहे. दारूच्या नशेत धिंगाणा घालणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यासोबतच बसस्थानक परिसरातील कथित बेकायदा दारूविक्रीची चौकशी करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

### दगडफेकीच्या घटनेची गंभीर दखल घेण्याची गरज

■ प्रवासी बसवर दगडफेक होणे ही केवळ किरकोळ घटना नसून सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेच्या सुरक्षेशी संबंधित गंभीर बाब आहे. संबंधित व्यक्तीविरुद्ध कायदेशीर कारवाई झाली का? बसस्थानक परिसरात बेकायदा दारूविक्री होत असल्यास त्यावर कारवाई का होत नाही? या प्रश्नांची उत्तरे प्रशासनाने जनतेसमोर देण्याची गरज आहे. आष्टी बसस्थानक परिसरातील मद्यपींचा वावर, कथित अवैध दारूविक्री आणि प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न यावर पोलीस प्रशासन, राज्य परिवहन महामंडळ व उत्पादन शुल्क विभागाने संयुक्तपणे लक्ष घालून तातडीने कारवाई करावी, अशी मागणी प्रवासी व नागरिकांतून होत आहे.




### जेवणाचे बोर्ड, पण मागच्या दाराने दारूविक्रीचा आरोप

बसस्थानक परिसरातील काही ठिकाणी जेवणाचे बोर्ड लावून त्याआडून विना परवाना देशी दारू अथवा हातभट्टीची विक्री होत असल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे. बाजारतळ परिसरातील कथित विनापरवाना देशी दारू विक्रीही मागील बाजूने सुरू असल्याची चर्चा आहे. या आरोपांची उत्पादन शुल्क विभाग व पोलिस प्रशासनाने तातडीने तपासणी करण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.

---

# मी काय कुठून बाजारातून किंवा जत्रेतून हात धरून आलेलो नाही : माजी आ.आजबे

## तुमच्यासारख्या वर्ग २ च्या जमिनी स्वतःच्या नावावर केल्या नाही

■ आष्टी प्रतिनिधी

दुष्काळावरील विविध मागण्यांसाठी बीड येथे जिल्हाधिकारी कार्यालयावर आयोजित केलेल्या मोर्चामध्ये बोलताना माजी आ बाळासाहेब आजबे यांनी "साहेब मॅडमला थोडं आवरा" असा उल्लेख केल्याने.

आमदार सुरेश धस यांच्या पत्नी प्राजक्ता धस यांनी प्रसिद्धी पत्र काढून माजी आ.बाळासाहेब आजबे यांना आवाहन केले होते की, तुम्ही भाऊसाहेब आजबे यांचे खरे वारसदार असाल तर पुरावा देऊन सिद्ध करून दाखवा. असे आवाहन केल्याने या आव्हानाला प्रत्युत्तर म्हणून माजी आ.बाळासाहेब आजबे यांनी आपल्या निवासस्थानी आज दि.०२ ऑक्टो २०२६ रोजी दुपारी एक वाजता पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते.

यावेळी बोलताना आजबे म्हणाले की, वारंवार माझ्यावर व माझ्या कुटुंबावर देवस्थान जमिनी विषयी आरोप केले जातात की श्रीराम ट्रस्ट दादेगाव या ट्रस्टची शिराळ येथील ७०० एकर जमीन असून यापैकी ३५० एकर जमीन मी व माझ्या कुटुंबाकडे असल्याचा वारंवार उल्लेख केला जात आहे. परंतु शासनाच्या पंचनाम्यानुसार माझ्याकडे व माझ्या कुटुंबाकडे फक्त तीन हेक्टर जमीन असून त्याचा शेतसारा आम्ही नियमित भरलेला आहे. १९३२ ते २०२५ पर्यंत त्याच्या पावत्या आहेत. परंतु ही जमीन सन १७०५ पासून त्याच्याही आधीपासून हि पिढ्यानपिढ्या आमच्या पूर्वजांकडून आमच्याकडे आली आहे. त्यासंदर्भात आमच्याकडे पुरावे आहे. राजाराम महाराजांच्या राज्याभिषेक पासून त्यांनीही बाळाचे विश्वनाथ यांना पत्राद्वारे सांगितले होते त्याचाही पुरावा आहे. त्या पुढील काळात निजाम काळातीलही पुरावे आहेत. मात्र आपण पिंपळेश्वर देवस्थान विठोबा देवस्थान, मायंबा देवस्थान याहून अधिक देवस्थानाच्या जमीनी प्राजक्ता ताई यांच्या नावावर कोणत्या अधिकाऱ्यांवर दबाव आणून घेतल्या याचा खुलासा होऊन जाऊ द्या. पिंपळेश्वर देवस्थानाच्या जमीनीत अनिशा ग्लोबल कसे उभे राहिले याचाही खुलासा होऊ द्या. यापुढील काळात या तालुक्यामध्ये अनेक कुटाणे चालू आहेत.

### आष्टी तालुक्यातील देवस्थानाच्या जमिनी धोक्यात

■ आष्टी तालुक्यातील पिंपळेश्वर देवस्थान विठोबा देवस्थान मायंबा देवस्थान याहून अधिक देवस्थानाच्या जमिनी धोक्यात आल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. कारण पिंपळेश्वर देवस्थानचे अध्यक्ष आमदार धस, विठोबा देवस्थानच्या अध्यक्षा प्राजक्ता धस., मच्छिंद्रनाथ देवस्थान सावरगाव यामध्ये सदस्य आमदार धस. याचा पुरावा म्हणजे इनामी जमिनी प्राजक्ता धस यांनी कशाच्या आधारावर नावावर करून घेतल्या तसेच उरलेल्या जमिनी कार्यकर्त्यांची नावावर करण्याचे कटकारस्थान चालू आहे. यामुळे आष्टी तालुक्यातील देवस्थानी जमिनी राहतील का नाही भरोसा नाही.

### माझ्यावर व माझ्या कुटुंबावर फौजदारी गुन्हे दाखल करण्यासाठी आमदार धसांचे पत्र



■ आमदार सुरेश धस यांनी मी व माझ्या कुटुंबामध्ये श्रीराम देवस्थान दादेगाव यांची शिराळ येथील ७०० एकर असलेली जमीन यापैकी ३५० एकर जमीन बळकवल्याचा आरोप करून माझ्यावर व माझ्या कुटुंबावर फौजदारी गुन्हे दाखल करावेत यासाठी अनेक वेळा पत्र व्यवहार केल्याचा पुरावाही माजी आ. बाळासाहेब आजबे यांनी दाखवला. या पुढील काळात मीही पुराव्याशी सर्व प्रकरणे बाहेर काढणार. तसेच मी ही अब्रू नुकसानीच्या दावा दाखल करणार. माजी आ. बाळासाहेब आजबे

---

# शेगावहून देवीची मूर्ती घेऊन जाताना समृद्धी महामार्गावर भीषण अपघात, 7 जणांचा मृत्यू

■ अमरावती वृत्तसंस्था

अमरावती जिल्ह्यातील धामणगाव रेल्वेजवळ शुक्रवारी पहाटे समृद्धी महामार्गावर भीषण अपघात झाला. या अपघातात 7 जणांचा मृत्यू झाला आहे. तसेच 18 जण जखमी झाले आहेत. वर्धा येथील सिंदी मेघे परिसरातील सार्वजनिक दुर्गा पूजा उत्सव समितीचे 25 ते 30 कार्यकर्ते टेम्पो-पिकअप वाहनाने शेगाववरून दुर्गा माता मूर्ती घेऊन वर्ध्याकडे परतत होते. तेव्हा बोलेरो पिकअप वाहनाला मागून येणाऱ्या ट्रकने धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, वाहनाचा चक्काचूर झाला. गाडीतील काही कार्यकर्ते थेट महामार्गाच्या बाजूला फेकले गेले. अपघातात 5 जणांचा जागीच मृत्यू झाला तर दोघांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. घनश्याम पाटील, प्रवीण बकाने, गोलू बादलगवार, ओम गावंडे, दत्ताजी खुरसागे, रोशन राऊत व मुनेश्वर ढोले अशी मृत व्यक्तींची नावं आहेत. मृतांमधील सर्वजण सोमनाथ लेआउट सिंधी मेघे येथील रहिवासी होते. अपघाताची माहिती मिळताच, स्थानिकांनी घटनास्थळी धाव घेतली आणि जखमींना नजीकच्या रुग्णालयात दाखल केले आहे. यापैकी तिघांची प्रकृती चिंताजनक आहे. वर्धा येथील सिंदी मेघे



परिसरातील सार्वजनिक दुर्गा पूजा उत्सव समितीचे 25 ते 30 कार्यकर्ते शेगावला गेले होते. ही सर्व तरुण मंडळी 28 तारखेस शेगावला पोहचली होती. त्यानंतर शेगाववरून टेम्पो-पिकअप वाहनाने दुर्गा माता मूर्ती घेऊन वर्ध्याकडे परतत होते. बोलेरो पिकअप वाहनाने 30 सप्टेंबर रोजी त्यांचा मूर्तीसह परतीचा प्रवास सूरू झाला. मूर्ती असल्याने वाहन अत्यंत संथ गतीने निघाले होते. अवघ्या 5 च्या स्पीड वाहन चालवत होते असं, रुग्णालयात उपचार घेत असलेले शिवम राऊत यांनी सांगितलं. मूर्ती गावाजवळ पोहचत असतानाच 12 चाकी अजस्त्र ट्रक या गाडीला वेगात येऊन धडकला. महामार्गाच्या अगदी एका बाजूला आमचे वाहन जात असताना आमची काहीच चूक नव्हती. मात्र ट्रक धडकला आणि होत्याचे नव्हते झाले, असे राऊत यांनी सांगितलं. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. या प्रकरणी पोलिसांनी तपास सुरू केला आहे. तसेच जखमी रुग्णाची विचारपूस केली. या अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून पोलिसांकडून घटनेची सविस्तर चौकशी करण्यात येत आहे. या दुर्गा मंडळाचे हे आठवे वर्ष आहे. गेल्या पाच वर्षांपासून ही मंडळी समृद्धी मार्गानेच मूर्ती घेऊन येत असतात. मूर्तीसोबत असल्याने डोळ्यात तेल घालून व दक्ष राहून प्रवास केला जातो. यावेळी 14 फूट उंचीची दुर्गामाता मूर्ती सोबत होती. पण हा प्रवास जीवघेणा ठरला.

---

# वैद्यनाथ कॉलेजमध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री जयंती उत्साहात साजरी

## महात्मा गांधी व शास्त्री यांचे विचार आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी : प्राचार्य डॉ. आर. डी. राठोड

■ परळी वैजनाथ : प्रतिनिधी

येथील जवाहर शिक्षण संस्थेच्या वैद्यनाथ कॉलेजमध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करून जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. जयंतीच्या निमित्ताने राज्यशास्त्र विभागाच्या वतीने मतदान जागृती, तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या माध्यमातून 'मानवतेसाठी आत्मजाणीव' या विषयावर विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. डी. राठोड होते. यावेळी विद्यापीठ विद्यापरिषद सदस्य व प्राध्यापक प्रतिनिधी डॉ. पी. एल. कराड, उपप्राचार्य डॉ. व्ही. बी. गायकवाड, प्रा. डी. के. आंधळे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. माधव रोडे, समन्वयक प्रा. उत्तम कांदे आणि स्टाफ सेक्रेटरी डॉ. एम. जी. लांडगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. एम. जी. म्हैत्रे यांनी करून कार्यक्रमाची पार्श्वभूमी स्पष्ट केली. यावेळी डॉ. माधव रोडे यांनी महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. गांधीजींचे सत्य, अहिंसा, स्वच्छता, स्वावलंबन व मानवतेचे विचार, तसेच शास्त्रीजींची साधी राहणी, प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा आणि राष्ट्रसेवेची भावना यांचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले.अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. आर. डी. राठोड म्हणाले की, "महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांचे विचार केवळ इतिहासापुरते मर्यादित नसून आजच्या सामाजिक




जीवनासाठीही मार्गदर्शक आहेत. विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांचा आदर्श घेऊन सत्य, अहिंसा, शिस्त, प्रामाणिकपणा आणि राष्ट्रनिष्ठा ही मूल्ये आपल्या जीवनात रुजवावीत."

लालबहादूर शास्त्री यांनी देशवासीयांना 'जय जवान, जय किसान' हा प्रेरणादायी नारा दिला. देशाच्या आर्थिक व सामाजिक प्रगतीमध्ये शेतकरी महत्त्वाचा कणा असून कृषी क्षेत्राच्या बळकटीकरणाला विशेष महत्त्व असल्याचेही त्यांनी नमूद केले.जयंतीनिमित्त रसायनशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भित्तिपत्रकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. मतदान जागृतीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही प्रक्रियेविषयी जागरूकता निर्माण करण्याचा संदेश देण्यात आला. तसेच 'मानवतेसाठी आत्मजाणीव' या उपक्रमातून सामाजिक बांधिलकी, मानवता आणि सामाजिक जबाबदारी याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. दिलीप गायकवाड यांनी केले, तर आभार डॉ.धांडे मॅडम यांनी मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संपादकीय

## 'अनाधिकार' आणि माघार

देशभरात उभे राहिलेले वादांचे मोहोळ, सहकारी निवडणूक आयुक्तांसह अनेक माजी निवडणूक आयुक्तांनीही घेतलेले आक्षेप, विविध पक्ष-संघटनांची आंदोलने-निदर्शने आणि न्यायालयीन खटलेबाजी यांची चाहूल लागल्यानंतर निवडणूक आयोगाने आपल्या हट्टापासून एक-एक पाऊल मागे घेण्यास सुरूवात केल्याचे दिसते. नव्या मतदारांसाठी भरण्यात येणाऱ्या अर्ज क्र. सहासोबत जोडाव्या लागणाऱ्या घोषणापत्राची वादग्रस्त तरतूद काही राज्यांमधून मागे घेण्याचा निर्णय हेच दर्शवतो. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कारभारावर अन्य दोघा निवडणूक आयुक्तांनी घेतलेल्या आक्षेपांमध्ये हा महत्त्वाचा मुद्दा होता, हे लक्षात घेण्याजोगे आहे.

मतदारयादीच्या सखोल पडताळणीची (एसआयआर) प्रक्रिया पूर्ण झालेल्या राज्यांमधील मतदारांसाठी या घोषणापत्राची तरतूद हटवण्यात आल्याने तेथील नवमतदारांना दिलासा मिळणार आहे. कायद्याला बगल देऊन प्रक्रियेमध्ये केलेले बदल आणि उलटसुलट भाष्य करून ते रेटण्याचा केलेला प्रयत्न आयोगाच्या अंगलट आला, असेच म्हणावे लागेल. मूळात, अशा तरतुदींचा हट्ट का धरला आणि आता नियम शिथिल केले असले, तरी त्यातून मतदानापासून वंचित राहिलेल्या लाखो मतदारांचे काय, हा प्रश्न विचारला जाणार आहे.

देशभरात चर्चा-वादांच्या केंद्रस्थानी राहण्यामध्ये ज्ञानेशकुमार यांनी माजी आयुक्त टी. एन. शेषन यांचाही विक्रम मोडला असावा. निवडणुकांचे वेळापत्रक ठरवण्यापासून, आचारसंहितेच्या अंमलबजावणीपर्यंत आयोगाच्या अनेक निर्णयांवर वाद झाले. त्यातले विरोधकांचे आरोप 'रडीचा डाव' म्हणून मोडीत काढणे सोपे होते; मात्र विवेक जोशी आणि सुखबीरसिंग संधू या सहकाऱ्यांनीच आक्षेप नोंदवल्याच्या प्रकरणाने आयोगाची पंचाईत झाली. त्यामध्ये प्रामुख्याने अर्ज क्र. सहामधील बदल 'बेकायदा' आणि 'अनधिकृत' असल्याचे आक्षेप होते. आयोगाकडून नव्या मतदारांनाही 'एसआयआर'ची पडताळणी लागू झाली. त्यांच्या अर्जासोबत परिशिष्ट म्हणून जोडलेल्या घोषणापत्रात मतदार, त्यांचे आई-वडील किंवा आजी-आजोबा पूर्वीच्या 'एसआयआर'चा इतिहास आणि त्यांचा मतदान केंद्र क्रमांक-अनुक्रमांक येथपर्यंत लांबण लावली गेली.

अनेकांकडे या जुन्या नोंदी नसल्याने त्यांची अडचण झाली. मतदार नोंदणी नियमांनुसार (१९६०) मतदारांची नोंदणी, नावे वगळणे-दुरुस्ती अर्जांत बदल करण्याचे अधिकार आयोगाला फक्त सरकारच्या कायदे मंत्रालयास आहेत; त्यामुळे तसे बदल करण्यासाठी सरकारी अधिसूचना गरजेची आहे. या मुद्द्यावरून वाद सुरू होताच आयोगाने शब्दच्छल आणि कोलांटउड्यांचे प्रात्यक्षिक दाखवले. प्रथम 'हा अर्जातला बदल नसून, जोडपत्र आहे,' असे सांगण्यात आले.

# शिक्षण सेवकांच्या मानधनात दरमहा २० हजारांची वाढ करा !

### कृती समितीची राज्य शासनाकडे मागणी ; काम नियमित शिक्षकांप्रमाणे आणि मानधन मात्र अत्यल्प



■ पुणे (प्रतिनिधी):

महाराष्ट्रातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये कार्यरत असणाऱ्या हजारो शिक्षण सेवकांच्या मानधनात दरमहा ₹०,००० ची वाढ करण्यात यावी, अशी मागणी 'शिक्षण सेवक मानधनवाढ कृती समिती, महाराष्ट्र राज्य' च्या वतीने राज्य शासनाकडे करण्यात आली आहे. महागाईचा वाढता आलेख आणि नियमित शिक्षकांइतक्याच पार पाडाव्या लागणाऱ्या जबाबदाऱ्या विचारात घेता, शासनाने स्वतः ठरवलेल्या पुनरावलोकनाच्या धोरणानुसार त्वरित अंमलबजावणी करावी, असा सूर या मागणीमागे आहे.

#### 22 सप्टेंबर 2022 च्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची वेळ

शासनाच्या दि. २२ सप्टेंबर २०२२ रोजी तत्कालीन मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत मानधनाचा किमान चार वर्षांतून एकदा पुनरावलोकन (Review) करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानंतर ९ फेब्रुवारी २०२३ रोजी मानधनात सुधारणा करण्यात आली असली, तरी गेल्या काही वर्षांत घरभाडे, प्रवास, अन्नधान्य, आरोग्य व दैनंदिन जीवनावश्यक वस्तूंचे दर गगनाला भिडले आहेत. त्यामुळे सध्याचे मानधन अत्यंत अपुरे पडत असून, मानधनवाढीची पुनर्विचार प्रक्रिया शासनाने आतापासूनच सुरू करावी, अशी आग्रही मागणी समितीने केली आहे.

#### काम नियमित शिक्षकांसारखे, मग मानधन अत्यल्प का?

अध्यापनासोबतच परीक्षा कामकाज, मूल्यमापन, विविध शासकीय उपक्रम, विद्यार्थी-पालक मार्गदर्शन, शालेय अभिलेख, सर्वेक्षणे आणि प्रशासकीय कामकाज अशा सर्व प्रकारच्या जबाबदाऱ्या शिक्षण सेवक पार पाडत आहेत. "काम नियमित शिक्षकांप्रमाणे आणि मानधन मात्र अत्यल्प, ही विसंगती दूर होणे अत्यंत गरजेचे आहे," अशी भूमिका कृती समितीने मांडली आहे.

#### राज्यभर तीव्र पाठपुरावा करणार

■ या संदर्भात मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री, शालेय शिक्षण मंत्री, मुख्य सचिव आणि शिक्षण आयुक्तांना निवेदने पाठवण्यात येत असून, संपूर्ण राज्यात या मागणीसाठी व्यापक पाठपुरावा केला जाणार आहे. विद्यार्थ्यांचे भविष्य घडविणाऱ्या शिक्षण सेवकांचे तमान सुरक्षित करणे ही शासनाची नैतिक जबाबदारी आहे. शासनाने मानधन पुनरावलोकनाचे तत्त्व मान्य केले असल्याने आता त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करून न्याय द्यावा.

■ — संदीप भोसले (राज्य समन्वयक, शिक्षण सेवक मानधनवाढ कृती समिती)

#### शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा.

■ दुर्गम भागात, वाड्या-वस्त्यांवर जाऊन ज्ञानदानाचे कार्य करणारे शिक्षणसेवक शिक्षणव्यवस्थेचा आधारस्तंभ आहेत. मर्यादित मानधनामुळे त्यांना आर्थिक व मानसिक ताण सहन करावा लागतो. सन्मानजनक जीवन जगता यावे यासाठी शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा.

■ — प्रा. शितल शिवाजी गोरे (शिक्षणसेवक)

# गांधीजी आणि महिला सक्षमीकरण : डॉ. सुवर्णा कराड

महात्मा गांधींच्या विचारांचा विचार करताना महिला सक्षमीकरण हा अत्यंत महत्त्वाचा विषय ठरतो. गांधीजींनी महिलांकडे केवळ कुटुंबाची जबाबदारी सांभाळणाऱ्या व्यक्ती म्हणून पाहिले नाही, तर राष्ट्रनिर्मितीतील सक्रिय आणि समान भागीदार म्हणून पाहिले. भारतीय स्वातंत्र्यलढ्याला व्यापक लोकचळवळीचे स्वरूप देताना त्यांनी महिलांना मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक जीवनात सहभागी करून घेतले.

गांधीजींच्या मते स्त्री आणि पुरुष यांच्यात मूलभूत मानवी मूल्यांच्या दृष्टीने भेद असू नये. स्त्रीमध्ये त्याग, धैर्य, सहनशीलता आणि नैतिक शक्ती आहे, असा त्यांचा विश्वास होता. मात्र महिलांच्या सक्षमीकरणाचा अर्थ केवळ या गुणांचे कौतुक करणे नव्हे, तर त्यांना सामाजिक आणि सार्वजनिक जीवनात समान संधी मिळणे आवश्यक आहे, ही भूमिका त्यांच्या कार्यातून दिसून येते.



स्वातंत्र्यलढ्यात महिलांचा सहभाग वाढविण्यात गांधीजींची भूमिका महत्त्वाची होती. असहकार आंदोलन, परदेशी वस्तूंचा बहिष्कार, खादीचा प्रसार, मिठाचा सत्याग्रह आणि भारत छोडो आंदोलन अशा विविध टप्प्यांमध्ये महिलांनी सक्रिय सहभाग घेतला. कस्तुरबा गांधी, सरोजिनी नायडू, कमलादेवी चट्टोपाध्याय, अरुणा आसफ अली यांच्यासह असंख्य सामान्य महिलांनी स्वातंत्र्यलढ्यात योगदान दिले. घराच्या चौकटीत राहणाऱ्या महिलांना सार्वजनिक आंदोलनात सहभागी होण्याचा आत्मविश्वास मिळणे हा त्या काळातील सामाजिक परिवर्तनाचा महत्त्वाचा टप्पा होता.

गांधीजींनी खादी आणि चरख्याला केवळ आर्थिक स्वावलंबनाचे साधन मानले नाही. त्यातून महिलांना उत्पादनाच्या प्रक्रियेत सहभागी होण्याची आणि स्वतःच्या श्रमाला सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देण्याची संधी मिळू शकते, असा त्यांचा विचार होता. त्यामुळे खादीचा कार्यक्रम हा स्वदेशी आणि स्वावलंबनाबरोबरच महिला सहभागाशीही जोडला गेला.

महिलांच्या प्रश्नांकडे पाहताना गांधीजींनी बालविवाह, हुंडा, स्त्रीशिक्षणाचा अभाव, सामाजिक विषमता आणि स्त्रियांवरील अन्याय यांसारख्या प्रश्नांवरही भूमिका मांडली. महिलांनी शिक्षित व्हावे, आत्मविश्वासाने सार्वजनिक जीवनात सहभागी व्हावे आणि स्वतःच्या अधिकारांविषयी जागरूक व्हावे, यावर त्यांनी भर दिला.

तथापि, गांधीजींच्या महिला विषयक विचारांकडे आजच्या दृष्टिकोनातून चिकित्सकपणे पाहणेही आवश्यक आहे. त्यांच्या काही कल्पना त्या काळातील सामाजिक परिस्थितीशी जोडलेल्या होत्या आणि आधुनिक स्त्रीवादी विचारांशी त्यांची पूर्ण सांगड घालता येत नाही. त्यामुळे गांधीजींच्या योगदानाचे मूल्यमापन करताना त्यांच्या काळाचा संदर्भ आणि आजच्या समानतेच्या संकल्पना या दोन्हींचा विचार करणे आवश्यक आहे.

आज भारतात महिलांनी शिक्षण, उद्योग, प्रशासन, राजकारण, विज्ञान, क्रीडा आणि विविध व्यावसायिक क्षेत्रांत महत्त्वपूर्ण प्रगती केली आहे. तरीही महिलांची सुरक्षितता, समान वेतन, रोजगारातील सहभाग, राजकीय प्रतिनिधित्व, घरगुती हिंसा आणि सामाजिक रूढी यांसारखी आव्हाने कायम आहेत. त्यामुळे महिला सक्षमीकरणाचा प्रश्न अद्याप पूर्णपणे संपलेला नाही.

गांधीजींच्या विचारांकडे आज पाहताना त्यातील सर्वात महत्त्वाचा संदेश म्हणजे महिलांना मदतीची गरज असलेला घटक म्हणून नव्हे, तर समाजपरिवर्तनाची सक्रिय शक्ती म्हणून पाहणे. स्वातंत्र्यलढ्यात महिलांना सहभागी करून गांधीजींनी भारतीय समाजाच्या सार्वजनिक जीवनात एक मोठा बदल घडवून आणला. म्हणूनच महिला सक्षमीकरणाच्या आजच्या प्रवासात गांधीजींच्या योगदानाचा अभ्यास केवळ इतिहास म्हणून नव्हे, तर सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेचा एक महत्त्वाचा टप्पा म्हणून करणे आवश्यक आहे.

**■ डॉ. सुवर्णा कराड, प्रदेशाध्यक्ष, वंजारी महासंघ, महिला आघाडी, महाराष्ट्र राज्य.**

# शाब्बास पठ्ठ्यांनो! एशियन गेम्सच्या फायनलमध्ये भारताची धडक, श्रीलंका 45 वर ऑल आऊट

■ मुंबई : प्रतिनिधी

आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ सेमी फायनल सामन्यात भारताने १२४ धावांनी विजय मिळवला आहे. या विजयासह भारताने फायनलमध्ये प्रवेश मिळवला असून सुवर्णपदकासाठी भारत-पाक लढत होणार आहे. या सामन्यामध्ये भारताने पहिल्यांदा फलंदाजी करताना २० ओव्हरमध्ये १६९-७ धावा केल्या होत्या. यामध्ये ईशान किशन याने ४६ चेंडूत नाबाद ८० धावांची तुफानी खेळी केली. त्यासोबतच वैभव सूर्यवंशीनेही ३८ धावांची खेळी करत महत्त्वाचे योगदान दिले होते. या धावांचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या श्रीलंका संघाने भारतीय गोलंदाजांसमोर शरणागती पत्करली. अवघ्या ४५ धावांवर त्यांचा डाव आटोपला. भारतीय संघ सुवर्णपदकापासून फक्त एक पाऊल दूर आहे.

#### अभिषेक शर्मा आणि संजू सॅमसन फेल

भारतीय संघ फलंदाजीला उतरल्यावर अभिषेक शर्मा आणि संजू सॅमसनदोघेही ७ धावा करून परतले. त्यानंतरवैभव सूर्यवंशी याने त्याची ताकद पुन्हा एकदा जगाला दाखवून दिली. वैभवने ३८ धावांची खेळी करत पॉवर प्लेमध्ये भारताला दमदार सुरूवात करून देत लवकर गेलेल्या विकेटचा दबाव येऊ दिला नाही. कॅप्टन श्रेयस अय्यरही फसला, १३ धावा करून तो माघारी परतला. अक्षर पटेल ८ धावा, तिलक वर्मा २ धावा करून परतले. मात्र पॉकेट डायनामाइट ईशान किशन याने सामन्याची सूत्रे आपल्य हातात घेतली. फक्त ४६ चेंडूत त्याने ८० धावांची खेळी करताना ४ चौकार आणि ५ षटकारांची आतषबाजी केली. वैभव आणि ईशानच्या खेळीने भारताला मोठी धावसंख्या उभारण्यास मदत झाली होती.



# रँकिंगचा नियम संपला! भारत वि. पाकिस्तान फायनल पावसामुळे रद्द झाल्यावर कसा देणार निकाल, गोल्ड कोणाला मिळणार?

■ मुंबई : प्रतिनिधी

**ईशान किशनच्या आक्रमक अर्धशतकाच्या जोरावर गतविजेत्या भारताने आशियाई क्रीडा स्पर्धेतील टी-२० क्रिकेटमध्ये उपांत्य लढतीत श्रीलंकेचा १२४ धावांनी पराभव केला. या विजयासह भारताने अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. आता अंतिम फेरीत भारताची तीन ऑक्टोबरला (शनिवार) पाकिस्तानशी लढत होईल. दुसऱ्या उपांत्य लढतीत पाकिस्तानने बांगलादेशला पराभूत केले. भारत आणि पाक सामन्याला काही तास बाकी आहेत. पण फायनल सामन्यामध्ये पावसाने हजेरी लावली तर सुवर्णपदक कोणाला दिले जाणार? काय आहे नियम जाणून घ्या.**

#### सामना रद्द झाला तर सुवर्णपदक कोणाला?

■ भारत-पाक सामना पावसामुळे रद्द झाला म्हणजे टॉस देखील होऊ शकली नाही, तर दोन्ही संघांना संयुक्तपणे विजेता घोषित करून गोल्ड मेडल विभागून दिले जाईल. नॉकआउट किंवा उपांत्य सामन्यांमध्ये पावसामुळे खेळ न झाल्यास उच्च रँकिंग असलेल्या संघाला थेट पुढे पाठवले गेले होते. पण फायनलासाठी हा नियम लागू होत नाही. सुवर्णपदकाचा अंतिम सामना रद्द झाल्यास मेडल दोन्ही देशांमध्ये सारखे वाटून दिले जाते.

#### भारत-श्रीलंका सामन्याचा धावता आढावा

■ खेळपट्टी फिरकीसाठी अनुकूल होती, तर फलंदाजांचा कस पाहणारी होती. भारताने प्रथम फलंदाजी स्वीकारली आणि ७ बाद १६९ धावा फलकावर लावल्या. अभिषेक शर्मा (७ धावा), संजू सॅमसन (७) आणि श्रेयस अय्यर (१३) अपयशी ठरले. वैभव सूर्यवंशीने २१ चेंडूंत सहा चौकार व दोन षटकारांसह ३८ धावा केल्या. ईशान किशनने एका बाजूने किल्ला लढविला. अक्षर पटेल (८), तिलक वर्मा (२), शिवम दुबे (३) झटपट माघारी परतले. ईशान किशनने ४६ चेंडूंत पाच षटकार व चार चौकारांसह नाबाद ८० धावा केल्या. लक्ष्याचा पाठलाग करताना भारतीय माऱ्यासमोर श्रीलंकेचा निभाव लागला नाही. खेळपट्टीवरून काही चेंडू अनपेक्षितपणे उसळत होते. भारताने दिलेल्या १७० धावांचा पाठलाग करतान श्रीलंका संघ ४५ धावांवर ऑल आऊट झाला.




दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# मुख्य निवडणूक आयुक्तांना हटवण्याच्या मागणीसाठी परळीत माकपची निदर्शने

**परळी / प्रतिनिधी**

निवडणूक आयोगाच्या कथित मनमानी कारभाराच्या निषेधार्थ आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पदावरून तात्काळ हटवण्याच्या मागणीसाठी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या (माकप) वतीने परळीत निदर्शने करण्यात आली. देशभरात पाच डाव्या पक्षांनी पुकारलेल्या आंदोलनाचा एक भाग म्हणून परळीत हे आंदोलन करण्यात आले असून, निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता टिकवण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

तीनपैकी दोन निवडणूक आयुक्तांनी मतदार नोंदणी, मतदारांची नावे वगळणे आणि 'विशेष सखोल पुनरावलोकन' (SIR) प्रक्रियेच्या अंमलबजावणीवर आक्षेप नोंदवले आहेत. इतर आयुक्तांच्या संमतीशिवाय निर्णय घेतले जात असल्याचा आणि मतदारांच्या डेटाबेसचे केंद्रीकरण केले जात असल्याचा आरोप करत, यामुळे निवडणूक व्यवस्थेवरील जनतेचा विश्वास कमी होत असल्याचे माकपच्या नेत्यांनी म्हणणे असून ज्ञानेश कुमार यांना मुख्य निवडणूक आयुक्त पदावरून तात्काळ हटविण्यात यावे, सदोष SIR प्रक्रिया तात्काळ थांबवावी आणि मतदार यादीतून चुकीच्या पद्धतीने वगळण्यात आलेल्या सर्व नागरिकांचे मतदानाचे अधिकार पुनर्स्थापित करावेत, आयोगाचे स्वतंत्र, पारदर्शक आणि लोकशाही पद्धतीचे कामकाज पुन्हा प्रस्थापित करावे, सर्वोच्च न्यायालयाने सुचविल्याप्रमाणे निवडणूक आयुक्तांची नियुक्ती करण्यासाठी पंतप्रधान, लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि भारताचे सरन्यायाधीश यांच्या समावेशाची निवड समिती नेमावी याकरिता शहीद भगतसिंग यांच्या जयंतीपासून (२८ सप्टेंबर) ते महात्मा गांधी यांच्या जयंतीपर्यंत (२ ऑक्टोबर) देशभरात डाव्या पक्षांकडून हा निषेध सप्ताह पाळण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर परळीत झालेल्या या निदर्शनांमध्ये माकपचे जिल्हा सचिव कॉ.अजय बुरांडे, सिटुचे जिल्हाध्यक्ष कॉ.बी. जी खाडे, जेष्ठ नेते पी एस घाडगे, कॉ मुरलीधर नागरगोजे, कॉ.पांडुरंग राठोड, कॉ भगवान बडे, कॉ सुदाम शिंदे, कॉ. किरण सावजी, श गंगाधर पोटभरे, श्रीकांत मांडे, कॉ. विष्णू देशमुख, पप्पु देशमुख, कॉ मदन वाघमारे कॉ जालिंदर गिरी, कॉ राधाकिशन जाधव यांच्यासह पुरोगामी आणि डाव्या चळवळीचे अनेक नेते, कार्यकर्ते उपस्थित होते.



# सिनेरंग : भूमी त्रीवेदिसोबत रंगणार रंगरास

रंग रास नवरात्री २०२६ गरबा, संगीत आणि उत्सवी संस्कृतीचा अधिक भव्य, मोठा आणि अविस्मरणीय सोहळा घेऊन मुंबईत परत येत आहे. प्रसिद्ध गुजराती पार्श्वगायिका भूमी त्रिवेदी यांच्यासोबत रंग रासचे सलग ५ वे वर्ष साजरे करणारा हा कार्यक्रम, हजारो गरबाप्रेमी, कुटुंबे आणि तरुणांसाठी संगीत, ताल आणि अविरत गरब्याची एक अविस्मरणीय संध्याकाळ देण्याचे वचन देतो.गेल्या काही वर्षांत, भूमी त्रिवेदी यांच्यामुळे रंग रास हा नवरात्रीचा एक अत्यंत आवडता अनुभव बनला आहे. आपल्या दमदार आवाजासाठी आणि उत्साही सादरीकरणासाठी ओळखल्या जाणाऱ्या त्या, पुन्हा एकदा या सोहळ्याचे मुख्य आकर्षण असतील. उत्तम दर्जाचे लाकडी गरबा फ्लोअरिंग, भव्य निर्मिती, दमदार ध्वनी व्यवस्था, आकर्षक प्रकाशयोजना, व्हिज्युअल इन्स्टॉलेशन्स, उत्तम दर्जाची सजावट, हॉस्पिटॅलिटी आणि फूड झोन्स यासोबतच दररोज आकर्षक बक्षिसे, सर्वोत्कृष्ट पोशाख स्पर्धा, जोशपूर्ण नृत्य स्पर्धा आणि संपूर्ण सोहळ्यादरम्यान लोकप्रिय सेलिब्रिटी पाहुण्यांची उपस्थिती.देखील असेल यामध्ये विधान परिषद सदस्य (एमएलसी) प्रवीण दरेकर, आमदार संजय उपाध्याय, माजी खासदार गोपाल शेट्टी, आणि इतर अनेक मान्यवर.उपस्थित राहतील.



# खामगाव ग्रामपंचायतीत महात्मा गांधी जयंती उत्साहात साजरी





**सिरसाळा | अतुल बडे**

परळी वैजनाथ तालुक्यातील खामगाव ग्रामपंचायत कार्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमास ग्रामपंचायतीचे सरपंच दत्ता भैया बडे, ग्रामसेवक, ग्राम रोजगार सेवक, ग्रामपंचायत शिपाई तसेच गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी महात्मा गांधी यांच्या सत्य, अहिंसा आणि स्वच्छतेच्या विचारांचे स्मरण करण्यात आले. ग्रामपंचायत परिसरात स्वच्छता व सामाजिक बांधिलकीचा संदेश देत जयंती साजरी करण्यात आली.

# पाली आणि मराठी : अभिजाततेतून ज्ञानपरंपरेचा गौरव

**भाषा** ही केवळ विचारांची देवाणघेवाण करणारे साधन नसते; ती एखाद्या समाजाच्या स्मृती, संस्कृती, ज्ञान, तत्त्वचिंतन, मूल्यव्यवस्था आणि जीवनानुभवांचे जतन करणारी सजीव परंपरा असते. म्हणूनच एखाद्या भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळणे म्हणजे तिच्या प्राचीनतेबरोबरच तिच्या साहित्यिक आणि बौद्धिक योगदानाची अधिकृत दखल होय. प्राचीन बौद्ध ग्रंथपरंपरेच्या कालदृष्ट्या आधीच्या साहित्यिक वारशामुळे पालीचा प्रथम उल्लेख करता येतो; त्यानंतर प्रदीर्घ ऐतिहासिक आणि साहित्यिक परंपरा लाभलेल्या मराठीचा विचार करावा लागतो. मात्र पाली आणि मराठी यांपैकी कोणती भाषा 'अधिक अभिजात' आहे, असा कोणताही अधिकृत क्रम भारत सरकारने निश्चित केलेला नाही. दि. ३ ऑक्टोबर २०२४ रोजी केंद्रीय मंत्रिमंडळाने पाली, मराठीसह प्राकृत, आसामी आणि बंगाली या पाच भाषांना अभिजात भाषेचा दर्जा देण्यास मान्यता दिली आणि भारतातील अभिजात भाषांची संख्या अकरा झाली. त्यामुळे ३ ऑक्टोबर हा मराठीच्या अभिजाततेचा अधिकृत गौरवदिन असताना, पालीच्या अभिजात दर्जाच्या पार्श्वभूमीवर भारतीय ज्ञानपरंपरेच्या व्यापक वारशाचा विचार करण्याचाही महत्त्वाचा दिवस ठरतो.

अभिजात भाषा ही संकल्पना केवळ 'जुनी भाषा' एवढ्यापुरती मर्यादित नाही. प्राचीन ग्रंथ किंवा नोंदविलेला इतिहास, दीर्घकाळ टिकून राहिलेली साहित्यपरंपरा, पिढ्यान्पिढ्या मौल्यवान मानले गेलेले साहित्य, ज्ञानपरंपरेशी असलेले नाते, गद्य-पद्य साहित्याबरोबरच शिलालेख आणि अभिलेखीय पुरावे अशा विविध निकषांचा विचार अभिजात दर्जासाठी केला जातो. २०२४ मध्ये सुधारित निकषांच्या आधारे भाषिक तज्ज्ञ समितीने पाली आणि मराठीसह पाच भाषांना हे निकष पूर्ण करणाऱ्या भाषा म्हणून शिफारस केली. त्यामुळे अभिजाततेचा अर्थ एखाद्या भाषेला दुसऱ्या भाषेपेक्षा श्रेष्ठ ठरविणे नसून तिच्या स्वतंत्र ऐतिहासिक आणि सांस्कृतिक योगदानाची दखल घेणे हा आहे.

पालीचे महत्त्व भारतीय बौद्धिक इतिहासाच्या दृष्टीने अत्यंत मोठे आहे. बौद्ध साहित्याच्या विशाल परंपरेशी पालीचा घनिष्ठ संबंध आहे. त्रिपिटक आणि त्यासंबंधित ग्रंथांमधून तत्कालीन भारतीय समाजजीवन, नैतिक विचार, मानवी आचरण, तत्त्वचिंतन आणि सामाजिक संबंधांचे अनेक पैलू समोर येतात. विनयपिटक, सुत्तपिटक आणि अभिधम्मपरंपरेमधील साहित्य भारतीय विचारविश्वाच्या इतिहासाचा महत्त्वाचा स्रोत मानले जाते. पालीचा अभ्यास त्यामुळे केवळ भाषाशास्त्राचा विषय राहत नाही; तो इतिहास, तत्त्वज्ञान, समाजविचार, धर्मविचार, संस्कृती आणि मानवाच्या नैतिक चिंतनाच्या अभ्यासाशी जोडला जातो. भारत सरकारच्या माहितीनुसार प्राचीन भारताच्या इतिहासाची पुनर्रचना करण्यासाठी पाली साहित्य महत्त्वाचे आहे, कारण त्यामध्ये भूतकाळावर प्रकाश टाकणारी मौल्यवान सामग्री आढळते. पालीचे वैशिष्ट्य तिच्या व्यापक सांस्कृतिक प्रभावातही दिसते. बौद्ध विचारांच्या प्रसाराबरोबर पाली साहित्यपरंपरा भारताबाहेरील अनेक प्रदेशांपर्यंत पोहोचली. श्रीलंका, म्यानमार आणि थायलंड यांसह विविध बौद्ध सांस्कृतिक प्रदेशांमध्ये पालीचा अभ्यास आजही केला जातो. पाली ग्रंथपरंपरेने भारतीय ज्ञान, नैतिक चिंतन आणि बौद्ध तत्त्वज्ञानाचा आशियातील विविध समाजांशी संवाद घडवून आणला. त्यामुळे पालीचा वारसा हा केवळ एका प्रदेशाचा किंवा एका समुदायाचा वारसा न राहता भारतातून विस्तारित झालेल्या व्यापक बौद्धिक आणि सांस्कृतिक देवाणघेवाणीचा भाग बनतो. पालीच्या अभिजाततेचा विचार करताना एक महत्त्वाची बाब लक्षात घेणे आवश्यक आहे. आज आपण 'पाली' या नावाने ज्या भाषिक परंपरेचा उल्लेख करतो, तिचा विकास आणि ग्रंथपरंपरा अनेक ऐतिहासिक प्रक्रियांमधून घडली आहे. त्यामुळे तिच्या इतिहासाचा अभ्यास करताना साधी आणि एकरेषीय मांडणी करण्याऐवजी उपलब्ध ग्रंथ, भाषिक पुरावे, हस्तलिखिते आणि ऐतिहासिक संदर्भ यांच्या चिकित्सक अभ्यासाची आवश्यकता आहे. अभिजात दर्जामुळे अशा संशोधनाला अधिक चालना मिळणे अपेक्षित आहे. प्राचीन ग्रंथांचे संपादन, विविध हस्तलिखितांची तुलना, भाषांतर आणि डिजिटल जतन यांमुळे पालीच्या ज्ञानपरंपरेचा अधिक व्यापक परिचय समाजाला होऊ शकतो.

मराठीची अभिजात परंपरा देखील तितकीच समृद्ध आणि प्रदीर्घ आहे. भारत सरकारच्या माहितीनुसार मराठीच्या भाषिक मुळांचा मागोवा अडीच हजार वर्षांहून अधिक मागे घेता येतो. प्राचीन महारठी, मरहट्ठी, महाराष्ट्री प्राकृत आणि अपभ्रंश मराठी अशा विविध भाषिक अवस्थांमधून तिचा विकास होत आधुनिक मराठीपर्यंत पोहोचला. या प्रदीर्घ प्रवासात मराठीने विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक परिवर्तनांचा स्वीकार केला. त्यामुळे मराठीचा अभिजात दर्जा हा केवळ आधुनिक मराठी भाषिक समाजाच्या भावनेचा विषय नसून तिच्या प्रदीर्घ भाषिक उत्क्रांतीची आणि साहित्यिक परंपरेची अधिकृत मान्यता आहे. मराठीच्या अभिजाततेचे खरे सामर्थ्य तिच्या साहित्यपरंपरेत प्रकर्षाने दिसते. संत ज्ञानेश्वरांची 'ज्ञानेश्वरी', संत नामदेवांचे अभंग, संत एकनाथांचे साहित्य आणि संत तुकारामांची अभंगगाथा यांनी मराठीला व्यापक वैचारिक आणि सामाजिक आशय दिला. या साहित्याने सामान्य माणसाच्या जीवनाशी संवाद साधला. ओवी, अभंग, भारूड, पोवाडा, लावणी, लोककथा आणि लोकगीतांच्या माध्यमातून मराठी लोकजीवनाच्या विविध स्तरांमध्ये रुजली. पुढे आधुनिक काळात कविता, कथा, कादंबरी, नाटक, आत्मचरित्र, पत्रकारिता, वैचारिक लेखन आणि संशोधन यांच्या माध्यमातून मराठीने आधुनिक समाजातील बदल, संघर्ष, प्रश्न आणि आकांक्षा यांना अभिव्यक्ती दिली. त्यामुळे मराठीची अभिजातता केवळ प्राचीनतेत नसून सतत विकसित होत राहिलेल्या साहित्यिक आणि सामाजिक अभिव्यक्तीतही आहे. पाली आणि मराठी यांची ऐतिहासिक वाटचाल वेगवेगळी असली तरी ज्ञानसंवर्धन हा दोन्ही भाषांमधील महत्त्वाचा समान धागा आहे. पालीने बौद्ध तत्त्वज्ञान, नैतिक विचार आणि प्राचीन भारतीय समाजजीवनाशी संबंधित साहित्याचे जतन केले, तर मराठीने महाराष्ट्राच्या सामाजिक-सांस्कृतिक जीवनाला व्यापक अभिव्यक्ती दिली. पालीतील ग्रंथपरंपरा आणि मराठीतील संतसाहित्य या दोन्हींकडे केवळ धार्मिक किंवा साहित्यिक वारसा म्हणून पाहणे अपुरे ठरेल. त्यामध्ये मानवी जीवन, सामाजिक संबंध, नैतिकता, दुःख, श्रम, समाजव्यवस्था आणि परिवर्तन यांविषयीचे विविध विचार दडलेले आहेत. या दोन्ही भाषांचा समाजशास्त्रीय, ऐतिहासिक आणि तुलनात्मक अभ्यास भारतीय समाज समजून घेण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरू शकतो.

अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर सर्वांत महत्त्वाचे काम म्हणजे या भाषांतील प्राचीन ज्ञानसंपदेचे शास्त्रीय पद्धतीने संवर्धन करणे. अनेक मौल्यवान ग्रंथ, हस्तलिखिते आणि भाषिक पुरावे अद्याप संशोधनाच्या व्यापक प्रवाहात आलेले नाहीत. त्यांचे दस्तऐवजीकरण, जतन, चिकित्सक संपादन आणि भाषांतर करणे आवश्यक आहे. पाली आणि मराठीतील प्राचीन साहित्य अन्य भारतीय तसेच परदेशी भाषांमध्ये उपलब्ध झाले, तर त्यांचा अभ्यास अधिक व्यापक पातळीवर होऊ शकतो. अभिजाततेचा लाभ विद्यापीठे, संशोधक, विद्यार्थी आणि सामान्य वाचक यांच्यापर्यंत पोहोचणे ही या प्रक्रियेची खरी कसोटी आहे. आजच्या डिजिटल युगात भाषासंवर्धनाच्या नव्या शक्यता निर्माण झाल्या आहेत. दुर्मीळ हस्तलिखितांचे संगणकीकरण, प्राचीन ग्रंथांचे डिजिटल संग्रह, इलेक्ट्रॉनिक शब्दकोश, ध्वनिसंग्रह, ऑनलाइन ग्रंथालये आणि शोधसुलभ माहितीभांडारे यांमुळे पाली आणि मराठीचा वारसा जगभर पोहोचविता येऊ शकतो. कृत्रिम बुद्धिमत्ता, संगणकीय भाषाविज्ञान आणि आधुनिक भाषांतर तंत्रज्ञानाचा उपयोग करून प्राचीन ग्रंथांच्या अभ्यासासाठी नवी साधने विकसित करता येतील. मात्र तंत्रज्ञानाच्या वापरासोबत ग्रंथाची शुद्धता, ऐतिहासिक संदर्भ आणि शास्त्रीय प्रामाणिकता जपणे अत्यावश्यक आहे. मराठीला मिळालेल्या अभिजात दर्जाचा उपयोग आधुनिक ज्ञानभाषा म्हणून तिची क्षमता वाढविण्यासाठी केला पाहिजे. विज्ञान, तंत्रज्ञान, वैद्यक, कायदा, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, शिक्षण आणि व्यवस्थापन अशा विविध ज्ञानशाखांमधील दर्जेदार साहित्य मराठीत उपलब्ध होणे गरजेचे आहे. मराठीतील उच्च शिक्षण आणि संशोधनासाठी संदर्भग्रंथ, शब्दसंपदा आणि परिभाषा समृद्ध झाली पाहिजे. भाषा अभिजात आहे असे सांगण्यापेक्षा त्या भाषेत आधुनिक ज्ञान निर्माण होत आहे का, नवीन पिढी ती ज्ञानभाषा म्हणून स्वीकारत आहे का आणि तिच्यामध्ये संशोधनाची क्षमता वाढत आहे का, हे अधिक महत्त्वाचे ठरते. पालीच्या बाबतीतही आधुनिक संशोधनाशी जोडलेले नवे प्रयत्न आवश्यक आहेत. पालीचा अभ्यास बौद्ध साहित्यापुरता मर्यादित न ठेवता इतिहास, समाजशास्त्र, तत्त्वज्ञान, भाषाशास्त्र, पुरातत्त्व, तुलनात्मक साहित्य आणि सांस्कृतिक अभ्यास यांच्याशी जोडला पाहिजे. पाली ग्रंथांमधील सामाजिक संस्था, नैतिक मूल्ये, मानवी संबंध आणि तत्कालीन जीवनपद्धतींचा चिकित्सक अभ्यास केल्यास भारतीय



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(समाजशास्त्राचे अभ्यासक)**

समाजाच्या प्राचीन इतिहासाचे अनेक पैलू स्पष्ट होऊ शकतात. त्यामुळे पालीचे संवर्धन म्हणजे केवळ एका प्राचीन भाषेचे संरक्षण नव्हे, तर भारतीय बौद्धिक इतिहासाच्या महत्त्वपूर्ण स्रोतांचे जतन होय.

शिक्षणसंस्थांची भूमिका या संदर्भात अत्यंत महत्त्वाची आहे. विद्यार्थ्यांना अभिजात भाषांची माहिती केवळ पाठ्यपुस्तकातील विषय म्हणून न देता त्यांच्या मागील इतिहास, साहित्य आणि ज्ञानपरंपरेशी जोडणे आवश्यक आहे. ग्रंथवाचन, हस्तलिखितांचा परिचय, भाषांतर, संशोधनपर प्रकल्प, चर्चासत्रे आणि डिजिटल साधनांचा वापर यांना प्रोत्साहन दिल्यास अभिजात भाषांबद्दलची जिज्ञासा वाढू शकते. प्राचीन भाषेचा अभ्यास हा भूतकाळात अडकण्याचा मार्ग नसून वर्तमान समजून घेण्याचे आणि भविष्य घडविण्याचे साधन आहे, ही भूमिका नव्या पिढीमध्ये निर्माण झाली पाहिजे. महाराष्ट्र शासनाने ३ ऑक्टोबर हा 'अभिजात मराठी भाषा दिवस' आणि ३ ते ९ ऑक्टोबर हा 'अभिजात मराठी भाषा सप्ताह' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामागे मराठीच्या सुमारे अडीच हजार वर्षांच्या परंपरेचे भान, तिच्या वैभवाचे संवर्धन, जनजागृती आणि संशोधनाला चालना देण्याची भूमिका आहे. त्यामुळे या दिवसाचे कार्यक्रम केवळ औपचारिक भाषणे आणि गौरवपर समारंभांपुरते मर्यादित न राहता वाचन, संशोधन, ग्रंथप्रदर्शने, भाषांतर, हस्तलिखित संवर्धन आणि विद्यार्थ्यांचा सहभाग यांवर आधारित असणे अधिक उपयुक्त ठरेल. पाली आणि मराठीचा गौरव करताना भारताच्या बहुभाषिक स्वरूपाचे भान ठेवणेही आवश्यक आहे. अभिजात भाषांचा दर्जा हा इतर भारतीय भाषा किंवा बोलींचे महत्त्व कमी करणारा नाही. उलट, भारतातील विविध भाषिक परंपरांचे ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वैभव अधोरेखित करणारी ही प्रक्रिया आहे. विविध भाषांमधील अनुवाद आणि ज्ञानाची देवाणघेवाण वाढल्यास भारतीय भाषिक संस्कृती अधिक समृद्ध होईल. पाली आणि मराठी या दोन्ही भाषा परस्पर स्पर्धेच्या नव्हे, तर भारतीय ज्ञानपरंपरेतील विविध प्रवाहांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या भाषा म्हणून समजून घेणे आवश्यक आहे.

३ ऑक्टोबरचा हा गौरवदिन म्हणूनच केवळ एका भाषेचा उत्सव नाही. पालीच्या प्राचीन ज्ञानपरंपरेपासून मराठीच्या प्रदीर्घ साहित्यिक प्रवासापर्यंत भारतीय समाजाने निर्माण केलेल्या बौद्धिक संपदेचे स्मरण करण्याचा हा प्रसंग आहे. अभिजाततेचा खरा अर्थ भूतकाळाचा केवळ गौरव करणे नसून त्या वारशाला वर्तमानाशी जोडणे आणि भविष्यासाठी अधिक सक्षम करणे हा आहे. पालीतील ज्ञानसंपदा आणि मराठीतील साहित्यपरंपरा संशोधन, शिक्षण, तंत्रज्ञान आणि सामाजिक प्रबोधनाशी जोडली गेली, तर अभिजाततेची मान्यता अधिक अर्थपूर्ण ठरेल. पाली आणि मराठी या दोन्ही भाषांची अभिजातता श्रेष्ठ-कनिष्ठतेत नव्हे, तर त्यांच्या स्वतंत्र ऐतिहासिक योगदानात आहे; एका भाषेने प्राचीन बौद्ध ज्ञानपरंपरेचे महत्त्वपूर्ण जतन केले, तर दुसरीने प्रदीर्घ सामाजिक-सांस्कृतिक अनुभवांना साहित्यिक अभिव्यक्ती दिली. या दोन्ही वारशांचा आधुनिक ज्ञाननिर्मितीशी सर्जनशील संवाद घडविणे, हीच अभिजात भाषा गौरवदिनाची खरी सार्थकता आहे.

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
● बीड, शनिवार , 03 ऑक्टोबर 2026

Last page

### पुनर्वापरातून पुनर्निर्माण ; ना. पंकजाताई मुंडेंच्या हस्ते ठाण्यातून झाला राज्यातील पहिल्या

# ‘महा आर-पेट बॉटल’ अभियानाचा थाटात शुभारंभ



**पर्यावरण विभाग आणि कोका-कोलाचा संयुक्त उपक्रम छत्रपती संभाजीनगर, नाशिक, बीडसह १३ ठिकाणी राबविण्यात येणार अभियान**

**पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्लास्टिकचा वाढता प्रभाव रोखणे काळाची गरज - ना. पंकजाताई मुंडे**






**ठाणे** | पर्यावरणाचा समतोल राखणे आणि प्लास्टिकचा वाढता प्रभाव रोखणे, ही काळाची गरज बनली असून ‘ग्लोबल वॉर्मिंग’ थांबवण्यासाठी सर्वांनी एकत्र येण्याची आवश्यकता आहे असं राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी येथे सांगितलं.

महाराष्ट्र शासनाचा पर्यावरण विभाग, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळ आणि ठाणे महापालिका यांच्या संयुक्त सहकार्याने हिंदुस्तान कोका-कोला बेव्हरेजेस कंपनी मार्फत वापरलेल्या फुड ग्रेड बाटल्यांचा पूनर्वापर करण्याचा राज्यव्यापी ‘महा आर-पेट बॉटल अभियानाचा शुभारंभ ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते आज ठाण्यातील हॉटेल ताज विवांता येथे मोठ्या थाटात पार पडला त्यावेळी त्या बोलत होत्या. अभियानाच्या स्टिकर्स चे अनावरण देखील याप्रसंगी झाले.

कार्यक्रमास आ. निरंजन डावखरे, आ. माधवी नाईक, आ. संजय केळकर, हिंदुस्तान कोका-कोला बेव्हरेजेस कंपनीचे प्रोजेक्ट मॅनेजर के. के. जोसेफ, चीफ पब्लिक ऑफिसर हिमांशू प्रियदर्शनी, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव राहुल रेखावार, प्रसिद्ध सिनेकलाकार प्रसाद ओक, अभिनेत्री शिवानी सुर्वे, अभिनेता अमित सियाल, डिनो जोसेफ यांसह विविध क्षेत्रांतील मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना पंकजाताई म्हणाल्या, प्लास्टिक अमर असले तरी त्याचे दुष्परिणाम अत्यंत गंभीर आहेत. या पार्श्वभूमीवर, शासनाचा एकही रुपया खर्च न करता स्वयंसेवी संस्थांच्या (एनजीओ) मदतीने प्लास्टिक पुनर्क्रियेचे महत्त्वपूर्ण कार्य सुरू करण्यात येत आहे. नाशिक, छत्रपती संभाजीनगर, बीड सह महाराष्ट्रातील १३ ठिकाणी राबविण्यात येणाऱ्या ‘महा आर-पेट’ या अभियानाची सुरुवात ठाण्यातून होत असून, असा उपक्रम राबवणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरेल.

**■ एक बॉटल पर्यावरण के नाम**

हॉटेल्स, मॉल यासारख्या ठिकाणी प्लास्टिक बाटल्यांचा वापर मोठ्या प्रमाणात होतो, वापरलेल्या बाटल्या एकत्र करून त्याचा पूनर्वापर करण्यासाठी हा उपक्रम कोका-कोलाने राबवला आहे.

पर्यावरण विभागातर्फे फोटो, व्हिडिओ आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून याची जनजागृती केली जात आहे. परंतु कर्तव्य आणि हक्क या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. फक्त आरसा पुसून चालणार नाही, तर डाग पुसला पाहिजे. ‘एक बॉटल पर्यावरण के नाम’ असे म्हणत प्रत्येकाने या अभियानात सक्रिय सहभाग नोंदवावा असं आवाहन ना. पंकजाताई मुंडे यांनी यावेळी केलं.

### कोका-कोला ने केले पंकजाताईंचे कौतुक

**पुनर्वापरातून पुनर्निर्माण ही कल्पना पर्यावरण विभागाच्या मंत्री म्हणून ना. पंकजाताई मुंडे यांची होती, त्याला आम्ही अभियानाचे स्वरूप दिले. त्यांनी यासंदर्भात आम्हाला वेळोवेळी मार्गदर्शन केले, प्रोत्साहन दिले आणि पर्यावरण वाचविण्यासाठी पुढाकार घेतला अशा शब्दांत कोका-कोलाचे चीफ पब्लिक ऑफिसर हिमांशू प्रियदर्शी यांनी त्यांचे कौतुक केले. कार्यक्रमास उपस्थित सर्व सेलिब्रिटींनी देखील या उपक्रमाचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या.**

# मातृ-पितृ स्मरणार्थ तुकाराम गाथा पारायण, एकनाथी भागवत कथा प्रवचन व कीर्तनांचे आयोजन

**मोठ्या संख्येने उपस्थित रहावे - भास्करमामा चाटे**







**परळी वैजनाथ** | मातृ-पितृ स्मरणार्थ परळी-बीड रोडवरील मुक्ताई लॉन्स येथे तुकाराम गाथा पारायण,एकनाथी भागवत कथा प्रवचन व मान्यवर कीर्तनकारांची कीर्तनसेवा या धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. ३ ते ९ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या अध्यात्मिक सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन भास्करमामा चाटे व परिवाराने केले आहे.

या कार्यक्रमाचा प्रारंभ शनिवार, ३ ऑक्टोबर रोजी तुकाराम महाराज गाथा पारायणाने होणार आहे. या कालावधीत संतवाङ्मय, हरिनाम, भागवत कथा व प्रवचनांच्या माध्यमातून आध्यात्मिक कार्यक्रम होणार आहेत. गुरुवार, ८ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ ते ७ वाजता ह.भ.प. चंद्रकांत महाराज वांजळे (वारजेकर), पुणे यांचे हरिकीर्तन होणार आहे. तसेच शुक्रवार, ९ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ ते १ वाजता ह.भ.प. ज्ञानसिंधू संदीपान महाराज हासेगावकर, अध्यक्ष सद्गुरू जोग महाराज वारकरी शिक्षण संस्था, आळंदी, यांचे काल्याचे कीर्तन होणार असून, त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाच्या संयोजनात ह.भ.प.अमोल महाराज गुट्टे, मार्गदर्शक हभप रामेश्वर कोकाटे, हभप गोविंद म. मुंडे कनैया आध्यात्मिक वारकरी शिक्षण संस्था, श्री. बाळासाहेब लटपटे चंद्रभागा आश्रम वारकरी शिक्षण संस्था आणि अखिल भारतीय वारकरी भजनी मंडळ यांचा सहभाग आहे. भाविकांनी या सप्ताहातील धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. सौ. शोभाताई व श्री. भास्करराव चाटे (मामा), निळकंठ चाटे,दिनकरचाटे,सौ. स्मिता व ॲड गिरीशराव मुरकुटे,सौ. अर्चना व श्री. श्रीकांत चाटे, सौ. वैशाली व श्री. शशिकांत चाटे तसेच डॉ. सौ. गौरी उर्फ स्वप्ना व श्री. रविकांत चाटे व संपूर्ण चाटे परिवार यांच्या वतीने करण्यात आले आहे.



# पुसद येथे फार्मासिस्ट सप्ताहाचा हर्षोल्हासात समारोप; गरजवंतापर्यंत पोहोचणे हाच खरा उद्देश

**महागाव | प्रतिनिधी**



पुसद येथे फार्मासिस्ट सप्ताहाचा समारोप आज गोविंद नगर, पुसद येथील रेणुका दिव्यांग संस्थेत अत्यंत हर्ष आणि उत्साहात पार पडला.

संस्थेतील निवासी दिव्यांग बंधू-भगिनींना किराणाची नितांत गरज असल्याची माहिती तेथील कार्यकर्त्याच्या व्हॉट्सअप स्टेटसवरून समजली. ही गरज लक्षात घेऊन फार्मासिस्ट परिवाराने दरवर्षीप्रमाणे "फुल नाही फुलाची पाकळी" म्हणून मदतीचा हात पुढे केला.

याच दिवशी पुसद येथील फार्मासिस्ट शुभम नरवाडे यांचे बंधू व महागाव येथील सामाजिक कार्यकर्ते प्रतीक नरवाडे यांचा वाढदिवस होता. त्यांना कुणालातरी मदत करून वाढदिवस साजरा करण्याची इच्छा होती. त्यानुसार वेळेचा विचार न करता रेणुका दिव्यांग संस्थेतील सदस्यांना लागणाऱ्या जीवनावश्यक वस्तू, किराणा साहित्य देऊन वाढदिवस अत्यंत आगळ्या-वेगळ्या आणि सामाजिक बांधिलकी जपत साजरा करण्यात आला.

यावेळी पुसद फार्मासिस्ट केमिस्ट परिवाराचे समन्वयक फार्मासिस्ट प्रशांत गावंडे यांनी दिव्यांग सदस्यांनी आरोग्याची काळजी कशी घ्यावी याबाबत सुवर्ण टिप्स दिल्या. अरिष्टो कंपनीचे मेडिकल रिप्रेझेंटेटिव्ह तथा फार्मासिस्ट रोशन राठोड यांनी त्या टिप्स सर्वांना वाचून दाखवून जनजागृती केली.

संस्थेतील दिव्यांग सदस्यांनी उत्कृष्ट संगीत गायन सादर करून वाढदिवसाचा आनंद द्विगुणित केला आणि सर्वांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाच्या शेवटी संस्थेतील सदस्यांनी सर्वांना गोड खाऊ देऊन निरोप दिला.

यावेळी महागाव येथील प्रफुल नरवाडे, फार्मासिस्ट श्रीकांत गावंडे उपस्थित होते. समारोप भाषण व कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्रीकांत गावंडे यांनी केले.

**■ सप्ताहभर विविध उपक्रम :**

जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांना औषध साक्षरता व आरोग्य मार्गदर्शन, समाजात चांगले कार्य करणाऱ्यांचा सन्मान, माता-भगिनींना आरोग्य विषयक मार्गदर्शन, जागतिक हृदय दिनानिमित्त नागरिकांना जनजागृती, आरोग्य विषयक माहितीपत्रक वाटप, जनजागृती रांगोळी स्पर्धा आणि गरजू दिव्यांगांना किराणा वाटप असे विविध समाजोपयोगी उपक्रम फार्मासिस्ट सप्ताहात समन्वयक प्रशांत गावंडे यांच्या नेतृत्वाखाली उत्कृष्टपणे राबविण्यात आले.

फार्मासिस्ट हा समाजाच्या प्रत्येक अडचणीत धावून येतो आणि आपली भूमिका चोख पार पाडतो याचा प्रत्यय या उपक्रमातून आला. याबद्दल सर्व फार्मासिस्ट, केमिस्ट बांधवांनी प्रशांत गावंडे यांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

# महापुरुषांचे विचार कधीही मारले जाऊ शकत नाहीत — प्रा. डॉ. विनोद जगतकर

**महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती उत्साहात**

**परळी वैजनाथ** | “महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांसारख्या महापुरुषांचे विचार कधीही मारले जाऊ शकत नाहीत. विचारांना मारणारी बंदुकीची गोळी अजून निर्माण होणे बाकी आहे. त्यामुळे त्यांच्या आचार-विचारांचा आदर्श घेऊन प्रत्येकाने आपले वर्तन व कार्य घडवावे,”असे प्रतिपादन कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयाचे इतिहास विभागप्रमुख प्रा. डॉ. विनोद जगतकर यांनी केले.

लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. यावेळी संस्थेचे सचिव मा. रवींद्रजी देशमुख, प्राचार्या डॉ. व्ही. व्ही. देशपांडे यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानंतर प्रा. डॉ. विनोद जगतकर यांनी आपल्या व्याख्यानातून दोन्ही महापुरुषांच्या जीवनातील अनेक प्रेरणादायी घटनांचा संदर्भ देत त्यांच्या राष्ट्रसेवा, त्याग आणि कार्याचा आढावा घेतला. त्यांच्या विचारांची आजच्या पिढीला असलेली उपयुक्तता त्यांनी स्पष्ट केली. अध्यक्षीय समारोपात संस्थेचे सचिव रवींद्र देशमुख यांनी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री या देशभक्त विचारवंतांच्या विचारांचा वारसा समाजाने पुढे नेण्याची गरज असल्याचे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा डॉ. विवेकानंद कवडे यांनी केले. तर कनिष्ठ विभागाचे रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. प्रविण फुटके यांनी आभार मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.

